नियमित दिवाणी मुकदमा क्र. २९/२०२१
(भुजंग परब वि.राजेश परब )

## :– नि. २६ खालील आदेश –:

वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रीया संहीता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी दाखल केलेला आहे. तसेच दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी नं. १ ते ६ यांची सामाईक असलेली मिळकत परिशिष्ठ 'अ' मध्ये सामाविष्ठ केलेली आहे. तसेच वादी व प्रतिवादी क्र. ६ यांची सामाईक मालकी कब्जाा भोग्याची मिळकत परिशिष्ठ 'ब' मध्ये सामाविष्ठ केलेली आहे. परंतू वादी व प्रतिवादी यांचा सामाईक इमला क्र.१७५ हा दाव्यामध्ये सामाविष्ठ केलेला नाही. कारण सदर इमल्याचे वाटप झाले असे असे वादीचे म्हणणे होते. परंतू प्रतिवादी यानी आपल्या कैफीयतीमध्य सदर इमला समाविष्ठ न केलेबाबत हरकत उभारली आहे. सबब सदरचा इमला क्र. १७५ दाव्यात समाविष्ठ करणे गरजेचे असल्याने त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती मागत असताना दावा परि नं.३ मधील पान नं. ४ वरील शवेटचे वाक्य कमी करुन अर्जातील मागणीनुसार दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रतीवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे देवून सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज हा खोटा व खोडसाळ असून फेटाळण्यास पात्र आहे. वादीने यापूर्वी नि.२१ वरील अर्जावर दाव्यामध्ये इमल्याचा समावेश करण्याची विनंती केली होती. सदरची दुरुस्ती मागताना नि. २६ कडील दुरुस्ती मागणे क्रमप्राप्त होते. वादी वारंवार दुरुस्ती अर्ज देवून दाव्यास विलंब करीत आहे. सबब सदरचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा अशी विनंती प्रतिवादीने केलेली आहे.

**४.** अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस धडेवाटप होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी नि.१८ येथे कैफीयत दाखल करुन त्यामुध्ये असे कथन केले की, दावा मिळकतीव्यतिरीक्त गांव मौजे बांबुळी येथे वडीलोपार्जीत दावा इमले आहेत. त्यापैकी प्रतिवादी क्र. १ ते ५ हे वडीलोपार्जीत इमला क्र. १७५ मध्ये राहत आहेत. तसेच सन १९७९ पर्यंत सदर इमल्यात वादी व प्रतिवादी एकत्र राहत होते. यावरुन सदरचा इमला हा दाव्यातील आवश्यक मिळकत आहे हे स्पष्ट होते. सदरच्या दाव्यामध्ये नि. क्र.१९ येथे मुद्दे निश्चित केलेले असून दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. सबब सदरचा दावा मुद्दे निश्चित झालेनंतर पुरावा देण्याच्या टप्प्यावर आहे असे दिसून येते. वादीची प्रस्तुत अर्जातील दुरुस्ती ही दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत

करणेसाठी आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती जरी दाव्याच्या प्राथमिक टप्यावर नसली तरीही सदर दुरुस्तीमुळे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे.

**५.** सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणारा नाही, व दाव्यामध्ये अधिक स्पष्टता येणारी आहे. तसेच सदरच्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना अधिक कैफीयत तसेच वादीचा उलट तपास घेण्याची संधी असलेमुळे त्यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. याऊलट सदर दुरुस्ती मंजूर न झाल्यास वादी यांचे नुकसान होणारे आहे . तरी सदर दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी देणे मला उचित वाटते. सदर दुरुस्ती अर्जामुळे प्रतिवादी यांचा बहुमुल्य वेळ वाया गेल्यामुळे त्यांना योग्य तो खर्च देणे उचित वाटते. सबब सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. नि. २६ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे. .

२. वादी यांनी प्रतिवादी यांना रु.. ४००/-(रु.चारशे मात्र) खर्च दिलेनंतर अर्जातील मागणीप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

सही/-

दिनांक- २८/०२/२०२४

(प.रा.ढोरे )

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

कुडाळ.